# उत्तम कांबळे यांच्या कादंबरीचे विचारविश्व

**डॉ . राजेंद्र मुंढे**
सहाय्यक प्राध्यापक , मराठी विभाग
यशवंत महाविद्यालय सेलू जि. वर्धा
**पत्ता : आर्वी नाका , ज्ञानेश्वर नगर , वर्धा . मो**

## सारांश (Abstract)

**उत्तम कांबळे हे मराठीतील एक महत्त्वाचे लेखक असून त्यांचे आजतागायत कथा , कविता ,कादंबरी , आत्मकथन , ललितलेखन आणि संशोधनपर एकूण सत्तरच्या जवळपास पुस्तके प्रकाशित असून ते सातत्यपूर्ण लेखन करणारे लिहिते लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत . यात त्यांच्या समकालीन जाणीवेतून आणि एका विशिष्ट भूमिकेतून लिहिलेल्या सात कादंबऱ्याचा समावेश आहे .**

**कोणताही लेखक एका विवक्षित भूमिकेतून लेखन करीत असतो . यास आपण त्याची लेखन निष्ठा असे म्हणतो . त्याच्या त्या प्रेरणाही असतात . उत्तम कांबळे यांच्या लेखनाचे अधिष्ठान फुले –आंबेडकर –राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारधारेशी एकनिष्ठ आहे . दुसरीकडे मार्क्सवादही त्यांच्या लेखनात येत असलातरी तो आंबेडकर – मार्क्स असा समन्वयाच्या रुपात आलेला दिसतो . उत्तम कांबळे याच्या कादंबरी लेखनाचा विचारव्यूह हा असलातरी त्यांच्या लेखनाचे मध्यवर्ती केंद्र मात्र कायम माणूसच राहिला आहे.**

## बीज संज्ञा (key –Words)

**उत्तम कांबळे यांच्या लेखनाच्या विकार प्रेरणा ह्या महात्मा जोतीराव फुले , डॉ . बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज आहेत . याचा प्रत्यय त्यांच्या आजपर्यंत प्रकशित सातही कादंबऱ्यातून प्रत्ययाला येतो .**

## शोध निबंधाची उद्दिष्ट्ये (Objectives of Rrsearch Paper)

**प्रस्तुत शोध निबंधात उत्तम काबळे यांच्या कादंबऱ्याचे विचार सूत्र शोधण्याचा मुख्य उद्देश आहे . त्यासोबतच त्यांच्या कादंबऱ्या दलित कादंबरीच्या प्रवाहातील वेगळेपण कसे जपतात याचाही विचार या निबंधात करणे . लेखकाने आपल्या वैचारिकतेची**

बांधणी कथानकाच्या , पात्रांच्या अनुषंगाने कशी केली यांचा शोध घेणे , ही मुख्य उद्दिष्ट्ये आहेत .

## प्रस्तावना (introduction)

उत्तम कांबळे हे मराठी दलित साहित्याच्या प्रवाहातील महत्त्वाचे लेखक होत . कथा , कविता ,कादंबरी , आत्मकथन , ललितलेखन असे विविध साहित्य प्रकार हाताळून मराठी साहित्यात विशेषतःदलित साहित्यात मोलाची भर उत्तम कांबळे यांनी घातलेली आहे. मराठी साहित्यातील हे सर्व वाङ्मय प्रकार तर त्यांनी हाताळलेच पण त्यासोबत जिज्ञासू व संशोधक वृत्तीने अभ्यास करून त्यांनी संशोधन संपादनपर असे लिखाणही बऱ्याच प्रमाणात केलेले दिसते . त्यांची स्वतःची एक चिंतनगर्भ , वैचारिक भूमिका आहे . महात्मा जोतीराव फुले, राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जोपासणारे कांबळे यांच्या साहित्यात काही अंशी मार्क्सवादी विचार डोकावत असला तरी ते पूर्ण मार्क्सवादाचे समर्थक आहेत असे म्हणता येत नाही . आंबेडकर –मार्क्स समन्वयवादी भूमिकेचे समर्थक असणारे उत्तम कांबळे या सर्व वादाच्या पलीकडे जाऊन जागतिकीकरणाच्या युगाचे संदर्भ लक्षात घेऊन मानवताबादी मनोभूमिकेतुन 'माणूस' हा साहित्याचा केंद्रबिंदू ठेवून लिखान करताना दिसतात . म्हणूनच त्यांनी दलितांचे , ग्रामीण जीवनातील , स्त्रियांचे , आदिवासींचे साऱ्या मानवसमूहाचे प्रश्न आणि जीवन आपल्या लेखणीत बद्ध केलेले आहे. त्यामुळे विशिष्ट वाङ्मयीन वाद किवा साहित्याच्या प्रवाहांना सोबत घेवून जाणारा हा विज्ञानवादी दृष्टीकोन तसेच माणसाचे माणूसपण याला महत्त्व देणारा लेखक आहे हे लक्षात येते . या शोधनिबंधात कांबळे यांच्या आतापर्यंत प्रकाशित सातही कादंबर्यातील विचारविश्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखकाने केला आहे.

## वाङ्:मयीन प्रेरणा : (Literary Motivation)

लेखकाच्या साहित्यांच्या प्रेरणा हा त्याच्या वैयक्तिक जीवनात अंतर्भूत असतात. उत्तम कांबळे यांच्या साहित्यनिर्मितीच्या प्रेरणासुध्दा आपल्याला सभोवतालचे वातावरणही त्यांच्या साहित्य निर्मितीस कारणीभूत ठरलेले दिसते.महात्मा ज्योतिराव फुले व राजर्षी शाहू महाराज , डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स आदींच्या विचारांच्या प्रेरणा घेवून सम्यक परिवर्तनाच्या चळवळीचे यथार्थ आकलन करून घेणे आणि त्यांच्या विचारांचा वर्तमानाच्या संदर्भात अन्वयार्थ लावणे ही किमया साध्य झाली पाहिजे. तरच जगाचे वर्तमान समजेल, उमजेल आणि जगण्याच्या लढाईची वाट तुडवता येईल. वाट तुडवतांना भेटणाऱ्या माणसांसह

आलम दुनियेचे रंग ओळखता येतील. हे सारे उत्तम कांबळे यांनी आपल्या आयुष्याची लढाई लढताना साध्य केले आणि इतरांना आयुष्य लढण्याचे बळ दिले. महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स यांच्या विचार प्रेरणेतून लढविल्या गेलेल्या परिवर्तनवादी चळवळीतून दृष्टी आणि बळ मिळविले, यात कवीवर्य नारायण सुर्वे, तत्वज्ञ साहित्यिक बाबूराव बागूल, कवीवर्य कुसुमाग्रज व विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यासारख्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या सहवासाने त्यांचे व्यक्तिमत्व अधिकच फुलले दिसते .

आयुष्याची परवड झालेल्यांसाठी लढले पाहिजे हे भान त्यांना स्वतःला समजून घेत साऱ्या दुनियेला समजुन घेण्याचा त्यांचा सदैव प्रयत्न राहिलां . फुले-शाहु-आंबेडकरी विचारांच्या आधारावर, प्रेरणांवर त्यांच्या वैचारिक पाया परिपक्व झाला तर दृष्टी प्रकाशमान झाली. त्यामुळे देव-देव असलेल्या देवदासी प्रथे विरुद्धच्या लढाईत प्रत्यक्ष उत्तरले आणि या प्रथेचा थेट विच्छेद करणारी चिकित्सा केली . भटक्या विमुक्त ,इतर मागास, शेतमजूर, शेतकरी, कैदी, दलित, आदिवासी यांच्या प्रश्नाचे – समस्यांचे चिंतन केले. यातून उपेक्षितांचे, शोषितांचे जग सर्वासमोर आणले. भाकरीसाठी लढाई करणारे जग फार मोठे आहे हेच त्यांच्या सर्व लेखनाने अधोरेखित झाले . हे सारे एका अस्वस्थ नायकाचे अनुभव चिंतन वर्तमानाची मीमांसा करणारे ठरणारे आहे. त्यांच्या संशोधनात्मक लेखनाने आणि संपादनानेही वर्तमान वास्तवाचे दाहक चित्रे सर्वांच्या जाणिवा विकसित करणारे ठरले आहे.

## विषय विवेचन ( **Subject Analysis** )

उत्तम कांबळे यांनी आपल्या कादंबऱ्यातून सध्यस्थितीतील वास्तवचित्रित करून एक सामर्थ्यशील आशय आविष्कृत केलेला आहे. जीवनातील कठिणातील समकाळाशी कठीण प्रश्नांना खुलेपणाने जाऊन भिडणे आणि आपल्या साहित्यातून ते प्रखरतेणे मांडणे हे त्यांचे लेखन वैशिष्ट्य असून शेतमजूर , कष्टकरी , ग्रामीण जीवनातील सुशिक्षित तरुणाची बेकारी , किडलेली यंत्रणा , स्वार्थी भोगलोलूप वृत्तीची माणसे , राजकारण , भ्रष्टाचार , अज्ञानी आणि अडणीपणातून सर्वसामान्य माणसाचे होणारे शोषण, श्रद्धा , अंधश्रद्धा, अनिष्ठ प्रथा अशा अनेक प्रश्नांना साहित्यातून उजागर करणे म्हणजे सर्वसामान्य माणूस हा त्यांच्या लेखनाचा सदैव केंद्र बिंदू राहिलेला आहे . या लेखकाची नाळ समकाळाशी घट्ट बांधलेली दिसते . त्यांचे साहित्य हे समकाळाशी समांतर राहिले आहे .म्हणूनच ते समकालीन लेखन करणारे लेखक आहे ,

'श्राद्ध' (१९८६) ही उत्तम कांबळे यांची पहिली कादंबरी. या कादंबरीतून दलित चळवळीतील अंतर्विरोध मांडून जात संघर्ष व राजकीय संघर्ष किती टोकाला जातो यांचे चित्रण केलेले आहे. आबा कांबळे या ध्येयवादी व आंबेडकरवादी नायकाद्वारे कांबळे यांनी सर्व दलितांचा उन्नयन , मानवतावादी , पुरोगामी , आणि विज्ञानवादी दृष्टीकोन आणि आंबेडकरांचा सम्यक क्रांतीचा विचार कादंबरीतून प्रत्ययास आणला आहे . डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या मानवमुक्तीच्या लढ्याने दलितांमध्ये स्वाभिमान जागृत झाला आणि तो पुढे संघर्षशील बनला पण , त्याचवेळी समाजातील अंतर्विरोध या चळवळीला मागे नेत होता हे समकालीन वास्तव उत्तम कांबळे यांच्या या कादंबरीत प्रत्यकारकपणे आलेले आहे. या कादंबरीतून फुले –आंबेडकरी समानतेच्या विचारांची आणि चळवळीची पार्श्वभूमी लाभलेली आहे .

'अस्वस्थ नायक' (२००० ) ही लेखकाची तब्बल चौदा वर्षांनतर आलेली दुसरी कादंबरी . १९९१ नंतर जागतिकीकरणामुळे बदललेले समाज् जीवन , बकाल झालेले मानवी जीवन , ढासळलेली मूल्यव्यवस्था , भ्रष्ट झालेली शिक्षण व्यवस्था आणि बेकारीचा भस्मासूर यामुळे सुशिक्षित बेरोजगारांची तयार झालेली मोठी फौज, असे तत्कालीन वास्तव आपल्या या कादंबरीतून आहे रे , नाही रे या वर्गाची स्थिती व अवस्था प्रशांत देसाई या सुशिक्षित बेकार असणाऱ्या तरुणाच्या माध्यमातून मांडतांना समाजाचे राजकीय, आर्थिक ,धार्मिक ,नैतिक दुभंगलेपण चित्रित केले आहे . नायक सच्चा प्रामाणिक नीतिमान आणि शिक्षकीमुल्यांवर प्रगाढ निष्ठा असणारा आहे . पण समाजात विविध स्तरावरील भ्रष्ट नैतिकता पाहून तो अस्वस्थ होतांना दिसतो , पण तो स्वतःच्या व विचाराने भ्रष्ट समाजासमोर जिद्दीने उभा राहतो . विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकातील बेकारीच्या आणि हलाकीच्या हिंदोळयावर हेलकावणाऱ्या समकालीन तरुणाचे प्रातिनिधिक रुदन या कादंबरीतून आत्यंतिक समर्थपणे मांडले आहे.

' पन्नास टक्क्यांची ठसठस' (२०१४ ) ही लेखकाची पुन्हा चौदा वर्षानंतर आलेली तिसरी कादंबरी . या कादंबरीत पन्नास टक्के आरक्षणामुळे सरपंच झालेल्या एका दलित विधवा स्त्रीच्या जीवनाची झालेली फरपट चित्रित केलेली आहे . पुरुषप्रधान व्यवस्था तिचे सरपंचपद मान्य करत नाही उलट ती आपलीच मालमत्ता असल्याप्रमाणे गावाचा पाटील तिचा वापर करतो, म्हणजे अज्ञानामुळे तिच्याकडे अधिकार असतानाही तिच्या जीवनाची झालेली फरपट या कादंबरीतून येते . महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थात आरक्षणामुळे अचानक मिळालेल्या संधीकडे एक संकट म्हणून पुरुषी राजकीय सत्तेला सुरुंग लागतोय या भितीने गांगरून गेलेल्या

व्यवस्थेचे ताणेबाणे व्यक्त करण्यात उत्तम कांबळे यशस्वी झालेले आहेत . तत्कालीन काळात कळीचा मुद्दा आणि राजकीय धुराळा उडविणारा हा प्रश्न उत्तम कांबळे यांनी स्वतः पत्रकार व संपादक असल्याने मुळात शिरून मांडला आहे, , म्हणून ही एका महत्त्वाच्या समकालीन प्रश्नावर झोत टाकणारी कादंबरी ठरली आहे . महिला आरक्षणाच्या प्रश्नावर या कादंबरीतून मार्मिक असे भाष्य उत्तम काबले यांनी आपल्या चिंतनशील व वैचारिक प्रगल्भतेतून केलेले आहे .

उत्तम कांबळे यांची चवथी कादंबरी 'शेवटून आला माणूस' ( नोव्हेंबर २०१५ ) प्रकाशित झाली . प्रत्येक कादंबरीच्या विषयातील वैविध्य हे कांबळे यांचे लेखन विशेष होय , या पृथ्वीवर निसर्गात सजीव शृष्टीत सर्वात आधी जीव जंतू आले . त्यानंतर आला माणूस . माणसाला मेंदू नावाचा अनोखा आणि इतरांपेक्षा अधिक अवयव लाभल्याने त्याने त्याच्या बलबुत्त्यावर सारे विश्व आपल्या कवेत घेण्याच्या राक्षसी महत्वाकांक्षेपोटी निसर्गाचे - त्यातील मानवेतर जीवनाचे आपल्या स्वार्थलोभासाठी निरंतर दोहन केले . त्यातून निसर्गाचे आक्राळविक्राळ रूप अधूनमधून कोणत्या ना कोणत्या रुपात प्रगट होत असते . तरी माणूस हे जाणून बुजून समजून घेत नाही आणि आपल्याला पृथ्वीवरील सर्वश्रेष्ठ समजतो . कुत्री , मांजरे , गाय , बैल , गाढव , घार , डुक्कर, मुंगुस साप, बेडूक यांना तो तद्दन समजतो . त्यांचा जगण्याचा हक्क हिराऊन घेण्याचा प्रयत्न करतो . तर दुसरीकडे आपल्या भौतिक सुखाच्या आणि जीवघेण्या जगण्याच्या स्पर्धेत नैसर्गिक जगण्याची वाट कसा चुकला आहे आणि यातून पर्यावरणीय प्रश्नाची निर्माण झालेली शृंखला माणसाला कशी बद्ध करीत आहे. अशा माणसाला भेडसावणाऱ्या अनाकलनीय समकालीन आणि वैश्विक परिप्रेक्ष्यात महत्वाच्या प्रश्नाचा शोध 'मी , प्रा . शिवनामे आणि गुरुजी' या पात्रांच्या सकाळच्या वेळी फेरफटका मारतांना अवघ्या दोन तासाच्या संवाद -चर्चा - वादविवादातून ही कादंबरी आकाराला आली आहे . अतिशय मुल्यगर्भ आणि मानवी संमातन प्रश्नावर तात्विक अंगाने उलगडत जाणाऱ्या मानवाच्या अस्तित्वाचा शोध घेऊ पाहणाऱ्या महत्त्वाचा विषयावरील या कादंबरीचे मराठी समीक्षकांनी आणि जाणकारांनीही पाहिजे तसे स्वागत केले नसल्याचे दिसते .

'बुद्धाचा ऱ्हाट' (डिसेंबर २०१५ ) ही उत्तम कांबळे यांची पाचवी कादंबरी . एका सामान्य माणसांच्या म्हणजे 'रानबा'च्या जीवनात धम्म परिवर्तनामुळे कसा अमुलाग्र बदल होतो त्या बदलाच नाट्य म्हणजे ही लघु कादंबरी . रानबाचा विचार आणि कृती या कादंबरीतून प्रतिध्वनीसारखी उमटली आहे . ही एक आत्मसन्मानाची कथा आहे. लेखकाने धम्म परिवर्तनाचा ऐतिहासिक घटनेच्या पन्नास वर्षाच्या निमित्ताने या घटनेकडे एक लेखक

म्हणून बघितले आणि धम्मस्वीकारामुळे नायकाच्या बदललेल्या जीवनदृष्टीचा लेखाजोखा अत्यल्प पानात परंतु सटीकपणे मांडण्यात लेखक यशस्वी झाला आहे . या कादंबरीच्या लेखनामागे लेखकाची विवक्षित विचारदृष्टी स्पष्टपणे दृगोचर झालेली दिसते .

'मिरवणूक' (२०१६ ) सालात प्रकाशित झालेली एका वेगळ्या विषयावरील लघु कादंबरीच . मिरवणूक म्हटली की आपल्या डोळ्यासमोर येतात त्या वेगवेगळ्या मिरवणुका , उत्सवी , सणाच्या , धार्मिक , राजकीय ,सामाजिक आणि अलीकडे आर्थिक सुद्धा . विविध कारणांसाठी मिरवणुका काढल्या जातात . काय असतं मिरवणुकांच्या मागचं मानसशास्त्र , समाजकारण, काय असत त्याच अर्थकारण आणि राजकारणही . या बाबीचा शोध घेण्याच्या मागावर असलेल्या एखाद्या लेखकाने मिरवणूक ही विषयवस्तू केंद्रस्थानी ठेऊन लिहिलेली मराठीतील एकमेव कादंबरी असावी . याआधी वारी- दिंडी विषयावर विपुल लिहिल्या गेलेले आहे . मात्र, घोरपडी नावाच्या ग्रामपंचायत असलेल्या मोठ्या गावातील आनंदानंद बाबाच्या मिरवणुकीच्या माध्यमातून समकालीन जीवनातील भ्रष्ट राजकारण - समाजकारण - धर्मकारण आणि श्रद्धेच्या नावाखाली चाललेली बुवाबाजी , या बुवांनी आपल्या वेठीस ठेवलेले राजकारणी ,सरकारी अधिकारी- पोलीस अधिकारी यांना पुढे करून चालेली ही मिरवणूक कोण कोणती आणि कशी वळणे घेते याचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीतून येते . मिरवणुकीतून अराजकता , हिंसा आणि जाती - धर्म विद्वेष कसा भडकावला जातो नव्हे , मिरवणुका या सर्वांची कशी केंद्र असतात, हे या ४५ अंशाच्या वर पारा असताना दुष्काळी भागात पाणी पडू दे , या देवाला साकडेघालणाऱ्या म्हणा -प्रार्थना किंवा मागणी करण्यासाठी सकाळी सावताबाबाच्या नेतृत्वात निघालेल्या आणि रात्री काला आणि महाप्रसादाने संपलेल्या या मिरवणुकीत अठरापगड जातीची पथके नाच गाणी वादन करीत निघतात . बँड पथकाचे रुसवे फुगवे , या सर्वांचा कोलाज लेखकाने मांडला आहे मिरवणुकीच्या रथात सावताबाबा सोबत फौजदार , रानडुकरे, टरके ही अधिकारी मंडळी सामील झाली आहेत . ही मिरवणूक म्हणजे आजच्या समाजजीवनातील भीषण वैविध्यतेचे प्रातिनिधिक रुपच म्हणावं लागेल .

उत्तम कांबळे यांची कोरोनां काळाच्या सुरुवातीला प्रकशित झालेली 'कोयत्यावचं कोक' ही उस तोड कामगारांच्या जीवघेण्या संघर्षाची कहाणी म्हणजे ही कादंबरी . अवघ्या महाराष्ट्रात मराठवाड्यातील हा उसतोड कामगार आपल्या चिल्याबाल्यांसह पोटाची खळगी भरण्य्साठी भ्रमंती करीत असतो . यात स्त्रिया आघाडीवर असतात . त्यांनाच केंद्रस्थानी ठेऊन लिहिलेली ही कादंबरी. या स्त्रियांच्या उसाच्या फडात जाऊन अंगभर जखमा घेत उस तोडतात , मासिक पाळीच्या काळात चार दिवस रोजगार बुडू नये , भाकरी गुडघ्यात

मान घालून बसू नये म्हणून 'कोक' म्हणजे गर्भाशय काढून , त्यासाठी वेळप्रसंगी पैसाही खर्च करण्याची तयारी ठेवतात . या उसतोड महिलांमध्ये ही अनिष्ठ लाट आली असून, आपले गर्भाशय रोजगाराच्या आड येते असे त्यांना वाटतंय म्हणून तेच खारीज करायचं , अशी भावना किंवा धारणा या व्यवस्थेने त्याच्यापुढे निर्माण केली आहे . असे भयावह आणि अंगावर येणारे विवक्षित सत्य या कादंबरीतून मांडून लेखकाने एका कष्टकरी स्त्रीजातीच्या निसंतानीकरणाच्या प्रक्रियेला खीळ लावण्याचा प्रयत्न आपल्या या कादंबरीच्या रूपाने करून ज्वलंत समकालीन प्रश्नाला कादंबरीतून उजागर केले आहे

## निष्कर्ष ( Conclusion )

उत्तम कांबळे हे एक परिवर्तनवादी साहित्यिक आहेत. साहित्य हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव आहे. स्वाभाविकपणे त्यांच्या साहित्यातून प्रस्थापित व्यवस्थेविषयीचा असंतोष , विद्रोह प्रकट झालेला दिसतो . आंबेडकरी चळवळीने त्यांचे आत्मभान जागृत केले . त्यांना एक दृष्टीकोन दिला, तर मार्क्सवादाच्या अभ्यासाने त्याच्या दृष्टिकोनाला एक वेगळे परिमाण प्राप्त करून दिले.या दोन्हींना जगण्यातून प्राप्त झालेल्या शहाणपणाची जोड मिळाली . " विचारसरणीच्या एका खुंटाला आपली विचारशक्ती बांधून ठेवणे योग्य अचल नव्हे ,दृष्ट तर नव्हेच नव्हे , याचे भान कांबळे यांच्या कथा –कवितांमधून प्रकट झालेले दिसते यादृष्टीने कांबळे यांचा विद्रोह संयत स्वरुपात प्रगट झालेला दिसतो असा विद्रोह नेहमी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध असतो " या बाळकृष्ण कवठेकरांच्या विधानाचा प्रत्यय उत्तम कांबळे यांच्या कादंबऱ्यातून वाचकांना येतो . त्याचा हा विद्रोह त्यांना जगण्यातून , चळवळीतून वाचनातून निर्माण करीत एक निश्चित भूमिका घेण्यास बाध्य करते यातूनच त्याची वाटचाल सुरू आहे. विशेष म्हणजे त्यांना विविध प्रकारचे जीवन जगणाच्या आणि छोटया मोठ्या लढाया करणाऱ्या माणसांचा सहवासही मोठया प्रमाणात मिळाला आहे. त्यातून कांबळे यांचा विचारपिंड घडत गेला आहे. शिक्षण , परिवर्तन आणि प्रबोधन आदी घटकाचे जोरदार मिश्रण त्यांच्या लिहिण्या –बोलण्यात आढळते . तेच त्यांच्या या कादंबऱ्यामधील व्यक्तिरेखाच्या माध्यमातून दृगोचर होतांना दिसते. कादंबरी हा वाङ्मयप्रकार मानवी जीवनाचा विशालपट समग्रपणे कवेत घेणारा आहे, त्यात भूत- वर्तमान आणि भविष्यकाळाचे तसेच मानवीजीवनाच्या सामाजिक-सांस्कृतिक- भूसांस्कृतिक आणि भाषिक आविष्कार वास्तवाच्या आधारे लेखक करीत असतो, एकुणात मानवी जीवनाचे सम्यक दर्शन व्यापकतेने मांडण्याचे सामर्थ्य लेखकाला या वाङ्मय प्रकारात लाभत असते. याअर्थाने समकालीन आणि वास्तववादी दृष्टिकोनातून उत्तम कांबळे यांच्या सातही कादंबऱ्यातून याचा प्रत्यय आल्यावाचून

**राहत नाही . त्यांच्या लेखनाच्या प्रेरणा फुले -आंबेडकर -शाहू यांच्या विचाराने प्रेरित असून त्या आपल्याला त्यांच्या सर्व कादंब-यातून प्रकर्षाने प्रसुत झालेल्या दिसतात .**

## संदर्भ ग्रंथसूची (Bibliography )


1 कांबळे उत्तम . श्राद्ध , मनोविकास प्रकाशन , पुणे , सुधारित तिसरी आवृत्ती, २०१०

2 कांबळे उत्तम . अस्वस्थ नायक , मनोविकास प्रकाशन , पुणे , सुधारित तिसरी आवृत्ती, २०१०

3 कांबळे उत्तम , पन्नास टक्क्यांची ठसठस , लोक वाङ्मय प्रकाशन गृह , मुंबई , २०१४

4 कांबळे उत्तम , शेवटून आला माणूस , सकाळ प्रकाशन , पुणे , नोव्हेंबर २०१५

5 कांबळे उत्तम , बुद्धाचा ऱ्हाट, मनोविकास प्रकाशन , पुणे , डिसेंबर २०१५

6 उत्तम कांबळे , मिरवणूक , लोक वाङ्मय प्रकाशन गृह , मुंबई , २०१६

7 उत्तम कांबळे , कोयत्यावरचं कोक , लोक वाङ्मय प्रकाशन गृह , मुंबई ,जानेवारी २०२०


-----------------------------------------------


डॉ . राजेंद्र मुंढे

सहाय्यक प्राध्यापक , मराठी विभाग

यशवंत महाविद्यालय सेलू जि. वर्धा

पत्ता : आर्वी नाका , ज्ञानेश्वर नगर , वर्धा . मो ९४२२१४००४९ ,Email_ rajendramundhe004@gmail.com